# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

अंतर्गत - संज्ञापन पत्र

**प्रेषक :** प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रा.डी.डी.पवार
प्रा.एस.एस.सोनुने

**विषय :** नाशिक अंतर्गत स्वच्छताविषयक कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अभ्यास संशोधन प्रकल्पाबाबत

**प्रति :** मा. कुलगुरू,

**दिनांक:** ०५/०३/२०१५

संदभार्थ : **कृपया,मा.कुलगुरू हयांचे सोबत दि.४/३/२०१५ रोजी झालेल्या** सहविचार सभेतील मार्गदर्शनानूसार **संशोधन प्रकल्प प्रस्ताव सविनय सादर.**

(Minor Resuarch Project proposal )

- **प्रकल्पाचे शीर्षकः**

  नाशिक अंतर्गत स्वच्छताविषयक कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अभ्यास

- **प्रास्ताविकः**

  सर्वंकष स्वच्छतेचा विचार हा दैनंदिन जीवनात अत्यंत महत्वाचा आहे. नवशोधन हा आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या काळातील जणू मूलमंत्र आहे. त्यामुळे स्वच्छता विषयक अनेक व्यवहाराला शास्त्रीय ज्ञान-विज्ञानाची माहिती अनेक नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी तथागत बुध्दापासून म. गांधी, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी हयांनी विविध कार्यपध्दतीचा अवलंब केलेला आहे. हया सर्व कार्यनीती सूत्रबध्दपणे स्वच्छताविषयक कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना माहिती असल्यास त्याचा त्यांना चांगल्या प्रकारे त्यांना व संस्थेला,समाजाला उपयोग होतो.याविषयीचे शास्त्रीय ज्ञान,प्रशिक्षण,शिक्षण यांचीमाहिती कर्मचाऱ्यांना कितपत आहे. याबाबतची सविस्तर माहिती असल्यास त्यांचे कार्य सुलभतेने होवू शकते.विविध यंत्रे हाताळण्यासाठी ही त्यांना प्रेरणा मिळते.त्यांचे आरोग्य चागल्या प्रकारे राहते.त्यांच्यात कौशल्ये,कार्यवृध्दी होते असा विश्वास वाटतो. स्वच्छता विषयक कार्य करणा-या व्यक्तींना सुध्दा हया प्रकल्पामुळे नवशोधनाची माहिती प्राप्त होवून त्यांच्या कार्यात सुसुत्रता येईल.

- **प्रकल्पाची उदिदष्टे :**

  १. स्वच्छताविषयक शास्त्रीय माहितीचा अभ्यास करणे.
  २. स्वच्छताविषयक कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अडचणींचा अभ्यास करणे.
  ३. स्वच्छताविषयक कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणाचा अभ्यास करणे.
  ४. स्वच्छताविषयक कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अडचणीवर उपाययोजना सुचविणे

य.च.म. मु. विद्यापीठ
वित्त विभाग 12/3/15
आवक क्र. 747 दिनांक
क.शा./स.कु./उ.कु./ले.आ./वि.अ.

मा. कुलगुरू कार्यालय
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक
अंतर्गत आवक क्र. : VC/1145
दि. 14/03/15

(P.T.O)

- **प्रकल्पाची कार्यनिती** :
  १ प्रस्तुत प्रकल्पाअंतर्गत स्वच्छता विषयक शास्त्रीय दृष्टीकोनावर आधारित शास्त्रीय माहितीचा अभ्यास करण्यात येईल
  २. प्रस्तुत प्रकल्पाअंतर्गत वर्णनात्मक पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा वापर करुन माहितीचे संकलन करण्यात येईल.
  ३ माहिती संकलनासाठी प्रश्नावली,प्रत्यक्ष निरीक्षण,तज्ज्ञांच्या मुलाखती, क्षेत्रभेट इ. साधनांचा वापर करण्यात येईल.
  ४ अशा प्रकारे संख्यात्मक व गुणात्मक माहितीचे संकलन करुन निष्कर्ष काढण्यात येतील.

- **प्रकल्पासाठी आर्थिक नियोजन:**

| | | |
|---|---|---|
| १ तज्ज्ञ मुलाखत, क्षेत्रभेट ,प्रवास इ. | : | २०००/- |
| २. प्रश्नावली विकसन व छपाई इ. | : | ५०००/- |
| ३. चित्रफित विकसन : | | ५०००/- |
| ४. स्टेशनरी,मुद्रण,बांधणी इ. | : | ५०००/- |
| ५. किरकोळ खर्च | : | ३०००/- |
| | | ------------------ |
| | | एकूण खर्चः २०,०००/- |

कृपया वरील संशोधन प्रकल्प मान्यतेसाठी सविनय सादर

१) प्रा. विजयकुमार पाईकराव २)प्रा. डी.डी. पवार ३)प्रा. एस. एस. सोनुने

मार्फतः मा. संचालक ,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

UGC - DEB

मा. कुलसचिव

मा. वित्तअधिकारी

Account Officer

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक -४२२२२२



## नाशिक अंतर्गत स्वच्छताविषयक कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अभ्यास


संशोधक

- प्रा. विजयकुमार पाईकराव
- प्रा.दयाराम दु.पवार
- प्रा.सुभाष.श्रा.सोनुने



प्रकल्प आर्थिक साहाय्य

दूरशिक्षण ब्यूरो,विद्यापीठ अनुदान आयोग

२०१५